पोलीस महासंचालककार्यालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई -४०० ००१.
E Mail Id-desk20.dgoffice@mahapolice.gov.in

जा क्र. पोमसं / २० / १९५ / परिपत्रक / सणउत्सव / ०१ /२०२२, मुंबई, दि.२८/०९/२०२२

**विषय:- पोलीस अधिकारी/अंमलदार यांनी भारतीय संविधान, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मधील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करणे व कर्तव्यावर अथवा गणवेषामध्ये असतांना योग्य वर्तन ठेवणेबाबत.**

*****

महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम १९७९ मध्ये शासकीय अधिकारी / कर्मचाऱ्यांनी त्यांच्या व्यावसायिक आणि वैयक्तिकरित्या कसे कामकाज करावे हे निर्दिष्ट केले आहे. या नियमांनुसार शासकीय सेवक त्यांच्या सार्वजनिक कर्तव्याशी संबंधित कोणतेही खाजगी हित घोषित करतील आणि कोणताही विरोध असल्यास, सार्वजनिक हित जपले जाईल अशा रितीने तो मिटविण्यासाठी उपाय योजतील **(नियम ३(१)(xii))**. शासकीय सेवक हे औचित्यपूर्व आणि निःपक्षपातीपणे कार्य करतील आणि कोणाशीही, विशेषतः समाजातील गरीब आणि वंचित घटकांशी भेदभाव करणार नाहीत **(नियम ३(१) (xvii))**. त्याचप्रमाणे, जे कोणत्याही कायदयाच्या, नियमांच्या, विनियमांच्या आणि प्रस्थापित प्रथेच्या विरुध्द आहे किंवा असू शकते असे कोणतेही कृत्य करण्यापासून दूर राहतील **(नियम ३(१) (xviii))**. या सोबतच या नियमांनुसार शासकीय सेवकांना भारतीय संविधानाचे सर्वश्रेष्ठत्व आणि लोकशाहीची मूल्ये यांच्याप्रती वचनबध्द राहणे बंधनकारक आहे **(नियम ३(१) (iv))**.आणि जनतेशी सौजन्य व चांगले वर्तन राखणे आवश्यक आहे **(नियम ३(१)(xi))**.

वर्तणूक नियमांचा एकंदरीत अर्थ असा आहे की, शासकीय सेवकांनी कर्तव्याचे पालन करताना उच्च दर्जाचा निःपक्षपातीपणा दाखवणे आवश्यक आहे तसेच त्यांनी पक्षपातीपणा आणि पूर्वग्रह यांचा त्याग केला पाहिजे, जेणेकरुन त्यांची कर्तव्ये तटस्थपणे आणि निःपक्षपातीपणे पार पाडण्याच्या त्यांच्या क्षमतेशी तडजोड होणार नाही.

तथापि अलीकडे असे दिसून आले आहे की, काही पोलीसांचे वर्तन आणि कृती हया स्वीकार्य नाहीत. त्यांच्या सामाजिक आणि धार्मिक पूर्वग्रह आणि श्रध्दांमुळे लोकांशी किंवा प्रतिनिधी मंडळाशी संवाद साधताना त्यामध्ये वैयक्तिक पूर्वग्रह आणि श्रध्दांचा जाणीवपूर्वक किंवा नकळत प्रभाव असल्याचे दिसते. काही अधिकाऱ्यांनी स्वतः किंवा त्यांच्या अधिनस्त असलेल्या विभागांमार्फत वैयक्तिक फायदयासाठी किंवा अनुकूलतेसाठी किंवा लोकांकडून सौजन्य, सन्मान वाढविण्याकरीता त्यांच्या अधिकृत पदाचा गैरवापर करतात. काही प्रकरणांमध्ये, पोलीस ठाणेस भेट देणाऱ्या किंवा संरक्षणात्मक कोठडीत ठेवलेल्या किंवा गुन्हयांमध्ये अटक केलेल्या लोकांना वाईट वागणूक दिली जाते. अलीकडे एका महिलेस फार त्रास झाल्याने पोलीस ठाण्यास आणण्यात आले होते. परंतु त्या पोलीस ठाण्याच्या

स्टाफने तिच्या प्रकरणी तत्परतेने व योग्य पध्दतीने चौकशी न करता तिला पोलीस ठाण्यातून जावू दिले. या प्रकरणामुळे मोठया प्रमाणात टिका होवून पोलीस खात्यास मनस्ताप झाला होता.तसेच काही अधिकाऱ्यांनी ते काम करीत असलेल्या परिसरात ज्ञात असामाजिक घटकांच्या कार्यक्रमांना हजर राहून सत्कार स्विकारल्याने पोलीस विभागाला पेच निर्माण होतो. त्याचप्रमाणे सध्या समाजमाध्यमांवर काही घटकांमधील पोलीस अधिकारी व अंमलदार हे धार्मिक कार्यक्रमात / मिरवणुकीत गणवेषात नाचत असल्याच्या तसेच वाद्ये वाजवित असल्याच्या चित्रफिती दिसुन आल्या आहेत. काही पोलीस अधिकारी / अंमलदार हे वैयक्तिक पातळीवर समाजमाध्यमांव्दारे बेजबाबदार वक्तव्ये करीत असल्याचे तसेच स्वतःचे व इतरांच्या चित्रफिती तयार करुन त्या समाजमाध्यमांव्दारे प्रसारित करीत असल्याचेही दिसुन आले आहे.

उपरोक्त नमुद केलेल्या अस्वीकार्य कृत्यांमुळे भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १४ अन्वये प्रत्येक नागरिकाला बहाल केलेल्या कायदयासमोर समानता व कायदयाचे समान संरक्षण या मुलभूत हक्कांची पायमल्ली होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच अशा कृत्यांमुळे पोलीसांवरील विश्वास कमी होवुन जनमानसात पोलीसांच्या कार्यपध्दती व कार्यक्षमतेबाबत संदेह निर्माण होतो.

पोलीस खाते हे शिस्तप्रिय खाते असुन, पोलीस खात्याकडुन कायदयाची अंमलबजावणी करणे, गुन्हयांना आळा घालुन, गुन्हेगारांविरुध्द कायदेशीर कारवाई करणे तसेच गुन्हेगारांवर कायदेशीर कारवाईचा धाक असणे अपेक्षित आहे. पोलीस गणवेष हा कायदेशीर कर्तव्याकरिता परिधान केला जात असल्याने, त्याचा आदर ठेवुन, त्याअनुषंगाने केल्या जाणाऱ्या कर्तव्यांचा सर्वांना आदरपुर्वक अभिमान असणे गरजेचे आहे.

तरी सर्व घटकप्रमुख यांनी भारतीय संविधानातील प्रावधानांचे तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ अन्वये दिलेल्या सर्व नियमांसह या कार्यालयाकडुन वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे काटेकोरपणे पालन होईल, त्याचप्रमाणे पोलीसांची प्रतिमा मलीन होईल अशा प्रकारचे कृत्य, वर्तन केले जाणार नाही याबाबत दक्षता घेवुन अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

(मिलिंद भारंबे)
विशेष पोलीस महानिरीक्षक (का. व सु.)
पोलीस महासंचालक यांचेकरिता.

**जा क्र.:- पोअवा/वाचक/५१/परिपत्रक/वर्तन/ ९६०८ /वाशिम २२ दिं २९.०९.२०२२**

मा. पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कडील जा क्र पोमसं/२०/१९५ /परीपत्रक/सण उत्सव /०१/२०२२ मुंबई दिनांक २८.०९.२०२२ अन्वये पोलीस अधिकारी /अंमलदार यांनी भारतीय संविधान म.ना.सेवा (वर्तणुक)नियम १९७९ मधील तरतुदीचे पालन करण्याबाबतचे पत्र सोबत जोडले आहे. सर्व संबधीत अधिकारी/अंमलदार यांनी त्याप्रमाणे कार्यवाही करावी.
**{मा.पोलीस अधिक्षक यांचे आदेशान्वये}**

**(प्रवीण धुमाळ)**
पोलीस निरीक्षक वाचक
पोलीस अधिक्षक कार्यालय, वाशिम

प्रति,

१. अपर पोलीस अधिक्षक वाशिम.
२. सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी वाशिम जिल्हा
३. सर्व ठाणेदार वाशिम जिल्हा
४. सर्व शाखा प्रमुख ५. रापोनि पोमु वाशिम.